





Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com



वर्ष २ रे | अंक : ६४९. वा | शुक्रवार | दि. १२ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# काँग्रेसचा प्रभू श्रीरामविरोधी चेहरा पुन्हा एकदा देशासमोर आला; भाजपची टीका...

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

अयोध्येतील राम मंदिरात रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळा होत आहे. अवघे काही दिवस राहिले असल्याने लगबगीला वेग आला आहे. या सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात आलेल्यांना आमंत्रणे पोहोचली आहेत. यावरून विरोधक सातत्याने केंद्रावर टीका करताना दिसत आहेत. यातच आता काँग्रेस पक्ष राम मंदिर उद्घाटनाच्या सोहळ्यात सहभागी होणार नसल्याचे सांगितले जात आहे. काँग्रेसच्या या भूमिकेवर भाजपाने टीका केली असून, काँग्रेसचा प्रभू श्रीरामविरोधी चेहरा पुन्हा एकदा देशासमोर आला, या शब्दांत निशाणा साधण्यात आला आहे. काँग्रेसने जाहीर केले की, पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी आणि अधीर रंजन चौधरी यांनी राम मंदिर अभिषेक सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आमंत्रण आदरपूर्वक नाकारत आहे. भाजप आणि आरएसएस निवडणूक फायद्यासाठी याचा वापर करत आहेत. हा एक राजकीय कार्यक्रम बनविण्यात आला आहे, अशी टीका काँग्रेसने केली आहे. मीडियाशी बोलताना केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला. काँग्रेसचा प्रभू रामविरोधी चेहरा पुन्हा एकदा देशासमोर आला आहे. सोनिया गांधी यांच्या नेतृत्वातील काँग्रेस पक्षाने न्यायालयात कागदपत्रे सादर करताना म्हटले होते की, प्रभू श्रीरामांचे काहीच अस्तित्व नाही, याची आठवण स्मृती इराणी यांनी करून दिली. अयोध्येतील राम मंदिरात होणारा रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळा धर्म, आस्था या दृष्टिकोनातून भाविकांसाठी, रामभक्तांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे, असे स्मृती इराणी यांनी म्हटले आहे. दरम्यान, भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते नलिन कोहली यांनी म्हटले आहे की, काँग्रेस अधिकृतपणे सांगत आहे की, त्यांचे वरिष्ठ नेते २२ जानेवारीला अयोध्येत नसतील, यात आश्चर्य वाटायला नको. कारण गेल्या काही दशकांत काँग्रेसने असे एकही पाऊल उचलले नाही की, ज्यावरून असे म्हणता येईल की, त्यांना अयोध्येत मंदिर बांधायचे आहे. यूपीए सरकारने प्रभू रामाचे अस्तित्व नाकारण्यासाठी सर्वोच्च न्यायालयासमोर प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. या प्रकरणाची लवकर सुनावणी



व्हावी असे त्यांना कधीच वाटले नाही. आता तिथे मंदिर बांधले गेल्याने ते अयोध्येला जाणार नसल्याचे सांगत आहेत. तेथे मंदिर बांधावे असे त्यांना कधीच वाटले नाही, अशी टीका करण्यात आली.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाणा लोकसभा मतदारसंघ मूळ भाजपचा...

## भाजपाने मागावा: जिल्हा बैठकीत भाजपाचे लोकसभा निवडणूक प्रमुख माजी आ. विजयराज शिंदे यांची मागणी...

**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभा मतदारसंघाचा इतिहास पाहता हा मतदारसंघ पूर्वी भाजपाचा होता हे स्पष्ट होते. परंतु युतीमुळे हा मतदारसंघ मित्र शिवसेनेकडे देण्यात आला. सध्याचे खासदार शिंदे गटाचे असून त्यांच्याकडून युती धर्म पाडल्या जात नाही. भाजपाच्या कार्यकर्त्यांना ते कधीही विश्वासात घेत नाही किंवा त्यांच्याशी कुठलाही समन्वय ठेवून विकास काम करीत नाही. त्यामुळे हा मतदारसंघ याव- ेळी भाजपासाठी मागून जिल्ह्यातील भाजप नेत्यांनी नवीन इतिहास घडवावा अशा भावना माजी आ. विजयराज शिंदे यांनी व्यक्त केल्या. स्थानिक हॉटेल तुळजाईमध्ये ५ जानेवारी रोजी पार पडलेल्या जिल्हा भाजपाच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला भाजपा प्रदेश उपाध्यक्ष विश्वासात माजी आ. चैनसुख संचेती, आ. संजय कुटे, आ.आकाश फुंडकर, जिल्हाध्यक्ष सचिन देशमुख, लोकसभा समन्वयक मोहन शर्मा, भाजयुमो जिल्हाध्यक्ष यश संचेती यांचीही उपस्थिती होती. याप्रसंगी भाजपाचे लोकसभा निवडणूक प्रमुख माजी आ. विजयराज शिंदे यांनी बुलढाणा लोकसभा मतदार संघाचा इतिहास सांगताना पूर्वी याच मतदारसंघातून डी. जी. गवई (१९७५-७६) व सुखदेव नंदाजी काळे (१९८९) हे भाजपा- चे खासदार म्हणून निवडून गेले होते हेही विसरता कामा नये. सध्या शिंदे गटाचे खासदार हे भाजपाच्या कोणत्याच कार्यकर्त्यांना घेत नाही किंवा त्यांच्या सुखदु:खातही सहभागी होत नाही. परंतु आपल्याच पक्षाचे झेंडे लावतात.शिंदे गटाचे खासदार १०० टक्के निवडून येतात.असे कार्यकर्ते सांगत असले तरी माझ्या मते जर हा मतदारसंघ भाजपाला मिळाला तर २०० टक्के भाजपचा खासदार निवडून आल्याशिवाय राहणार नाही. विशेष म्हणजे शिंदे गटाच्याच बुलढाणा जिल्ह्यातील आमदाराने पत्रकार परिषदेत म्हटलेले आहे की, भाजपाच्या त्यांनी सर्व्हेमध्ये विद्यमान खासदार चार नंबर आहेत, असे असेल तर आपण इच्छुक असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. तेव्हा त्यांचाही विचार करता भाजपाने ही जागा मागितली पाहिजे. कारण सध्या देशात राम मंदिरामुळे भाजपमय वातावरण झाले आहे. राम मंदिराचा ज्याप्रमाणे इतिहास झाला त्याचप्रमाणे बुलढाणा मतदार संघ यावेळी भाजपाकडे ठेवून एक नवीन इतिहास घडविला पाहिजे असेही शिंदे म्हणाले. जिल्ह्यामध्ये शिवसेना (शिंदे गट) भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा गट अशा तीन पक्षांची युती आहे. परंतु या युतीचा धर्म पाळण्यात येत नाही, आम्ही दोन कोटीची कामे आणली होती परंतु शिंदे गटाचे खासदार व आमदारांनी या कामांना मुख्यमंत्र्यांकडून



स्थगिती आणली आहे. त्यामुळे ही कामे झाली नाहीत तर दुसरीकडे राष्ट्रवादीचे पालकमंत्री नुकतेच जिल्ह्यातून येऊन गेले आहेत मित्र पक्षाच्या कोणत्याही पदाधिकाऱ्यांना विश्वास- ात घेतले नाही किंवा त्यांच्याशी समन्वय ठेवला नाही, असा आरोप शिंदे यांनी यावेळी केला. रडल्याशिवाय आई सुध्दा बाळाला दूध पाजत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील भाजप नेत्यांनी यावेळी हा मतदार संघ भाजपासाठी कसा घेता येईल यासाठी प्रयत्न करून तशी मागणी करावी, जे होईल ते पाहिल्या जाईल. असेही विजयराज शिंदे यांनी यावेळी बोलून दाखविले.

## पालकमंत्री दिलीप वळसे पाटील आज जिल्हा दौऱ्यावर...

**जनसंचलन/सिंदखेडराजा**



राज्याचे सहकार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील उद्या शुक्रवार, (दि.१२) रोजी बुलडाणा जिल्हा दौ-यावर येत आहेत. पालकमंत्री श्री. वळसे -पाटील यांचे राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त उद्या सिंदखेड राजा येथील शासकीय विश्रामगृहावर छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी ८:४५ वाजता आगमन होईल. त्यानंतर सकाळी ९ वाजता राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊसाहेब भोसले यांच्या जन्मस्थळी आगमन व राजे लखुजीराव जाधव राजवाडा, सिंदखेड राजा - राज्य संरक्षित स्मारक व राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊसाहेब भोसले यांच्या ४२६ वी जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. तसेच जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजूर असलेल्या राजवाडा जतन व संवर्धन या कामाचे त्यांच्या हस्ते भूमिपूजन होणार आहे. राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊसाहेब भोसले यांचे जन्मस्थळ येथून सकाळी ९:३० वाजता पंचायत समिती येथे आगमन व सिंदखेड राजा विकास आराखडा संदर्भात बैठकीस उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊसाहेब भोसले यांच्या ४२६ वी जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम व राजमाता जिजाऊ यांच्यावर आधारीत टपाल तिकीटाचे सकाळी ११ वाजता अनावरण करण्यात येणार आहे. दुपारी १२:३० वाजता पंचायत समिती येथून जिजाऊ सृष्टी हॉल येथे राष्ट्रमाता यांच्या जन्मोत्सव सोहळानिमित्त आयोजित विविध सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर मोटारीने येथून हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाने पुण्याकडे प्रयाण करतील.

मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस लि.पुणे
MITCON™
Solutions for Sustainable Tomorrow
मिटकॉन नेचर बेस्ड सोल्युशन्स लिमिटेड
महोगनी विश्व ॲग्रो लिमिटेड
MAHOGANI VISHWA AGRO
कृषि-वानिकी : शाश्वत विचार!
देईल पर्यावरण संरक्षणासोबत आर्थिक समृध्दी!
MITCON NATURE BASED SOLUTIONS



कृषि-वानिकी : १.भारत हा कृषिप्रधान देश आहे, उत्तम प्रकारची जमीन व हवामान अनुकूल असल्याने कृषि-वानिकीच्या माध्यमातून उत्तम लाकूड निर्मिती हे संस्थेचे ध्येय आहे.
महोगनी लागवडीचे नियोजन: १.पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन असावी.
रोपांची लागवड पध्दती :- • एक एकर क्षेत्रासाठी ४४४ रोपे लागतील.
• लागवडीचे अंतर १०x१० फूट किंवा ८x१२ फूट असावे.
• सरासरी खड्ड्यांची लांबी, रुंदी व खोली १.५ x १.५ x १.५ फुटाची असावी.
भारतात लाकूड उद्योगातील संधी: १. निर्यातक्षम लाकूड निर्मिती करून ग्रामीण भागात उद्योग व रोजगार निर्मीती करणे.
मिटकॉनद्वारे शेतकऱ्यांना मिळणार कार्बन क्रेडिट
महोगनी कृषि-वानिकी लागवडीतून विश्वातील पहिला कार्बन क्रेडिट प्रकल्प

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# जिजाऊ जन्मोत्सवाच्या पूर्व संध्येला बुलढाणा शहर भाजपच्या मोटर सायकल रॅलीने माँ साहेब जिजाऊ यांना अभिवादन..

जनसंचलन/बुलडाणा

हिंदवी स्वराज्याच्या संकल्पिका राजमाता, राष्ट्रमाता माँ साहेब जिजाऊ यांच्या जयंती दिनाच्या पूर्व संध्येला आज दि.११ जानेवारी २०२४ रोजी बुलढाणा शहर भाजपाच्या वतीने लोकसभा प्रमुख मा.आमदार विजयराज शिंदे यांच्या जनसंपर्क कार्यालय शिवालय येथून शहराध्यक्ष श्री अनंता शिंदे यांच्या नेतृत्वात बुलढाणा शहरातून मोटर सायकल रॅली काढून माँ साहेब जिजाऊ याना अभिवादन करण्यात आले. शिवालय येथे माँ साहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेचे लोकनेते विजयराज शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच माजी नगरसेविका सौ वैजंतीताई कस्तुरे, ॲड.किरणताई राठोड, भाजपा महिला जिल्हा सरचिटणीस सौ उषाताई पवार,सौ योगिता बढे, जेष्ठ नेत्या सौ शोभाताई ढवळे,महिला शहराध्यक्ष सौ वर्षाताई पाथरकर,सौ मीना बिलारी,सौ योगिता शिंदे या जिजाऊ लेकींच्या हस्ते पूजन करून अभिवादन करत संपूर्ण बुलढाणा शहरातून मोटर सायकल रॅलीला सुरवात करण्यात आली. शिवालय पासून संगम चौक,जयस्तंभ चौक,मार्केट लाईन,कारंजा चौक,त्रिशन चौक,चिंचौक चौक ते पुढे बस स्टँड व नंतर शिवालय येथे रॅली ची समाप्ती करण्यात आली. रॅली मध्ये जय जिजाऊ जय शिवराय, छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी अश्या अनेक अनेक घोषणांनी शहर परिसर दणाणून गेला होता व भगवामय झाला होता. माँ साहेब जिजाऊ ह्यांनी हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहिले व ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी शिवरायांना प्रेरणा दिली त्यामुळे शिवराय तयार करायचे असतील तर प्रत्येक घराघरात आधी जिजाऊ तयार व्हायला हव्यात त्यामुळेच माँ साहेब यांचा जन्मोत्सव हा घरा-घरात लोकोत्सव म्हणून साजरा व्हावा अश्या प्रतिक्रिया भाजपचे बुलढाणा शहराध्यक्ष अनंता शिंदे यांनी या प्रसंगी व्यक्त केल्या. या मोटरसायकल रॅलीत महिला पदाधिकारी यांच्या सह भाजपचे कामगार मोर्चा प्रदेश सचिव श्री विश्राम पवार, कामगार मोर्चा प्रदेश प्रतिनिधी अण्णासाहेब पवार, कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष श्री दत्ता शिंदे, जिल्हा सचिव श्री अशोक कींहोळकर, मोताळा तालुकाध्यक्ष श्री गजानन घोंगडे, किसान मोर्चा जिल्हा सरचिटणीस श्री मंदार बाहेकर, तालुका सरचिटणीस श्री अर्जुन दांडगे, तालुका उपाध्यक्ष



श्री कुलदीप पवार,तालुका सरचिटणीस श्री सचिन शेळके, तालुका उपाध्यक्ष श्री राजू सुरपाटने, भाजयुमो तालुका सरचिटणीस यश तायडे, श्री पवण बगाडे, श्री संतोष पालकर, बाळू ठाकरे, कामगार मोर्चा तालुकाधक्ष्य श्री राजेंद्र पवार, श्री पप्पू सोनकर, अर्जुन कांबळे, प्रकाश राजगुरे, संदीप वानेरे, सुदर्शन कांबळे, अक्षय राठोड ,अशोक बाहेकर, सतीश देहाडराय , चंद्रकांत पाथरकर यांसह असंख्य भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सह वर्षीय अल्पवयीन बालिकेचा नराधमाने केला विनयभंग...

जनसंचलन/मलकापूर

तालुक्यातील एका गावात जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या सहा वर्षीय मुलीचा टिफीन पाहण्याच्या निमित्ताने विनयभंग केल्याची घटना मंगळवारी सकाळी घडली. याप्रकरणी मलकापूर पोलिसांनी आरोपीला गजाआड करून पोक्सोसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. तालुक्यातील एका गावातील जिल्हा परिषद शाळेत २९ वर्षीय व्यक्ती तिच्या पुतण्याला शाळेत सोडण्यासाठी आली होती. मंगळवारी सकाळी त्याने शाळेतीलच एका



सहा वर्षीय मुलीला जवळ बोलावले व टिफीन पाहण्याच्या कारणावरून तिचा विनयभंग केला. प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास पोलिस करत आहे.

## वरवंड ते आंबेटाकळी रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी दत्तात्रय जेऊघाले यांचा खामगाव बांधकाम विभागात राडा...

जनसंचलन/ खामगाव

वरवंड ते आंबेटाकळी या रस्त्याचे काम गेल्या ४ वर्षांपासून अत्यंत कासवगतीने चालू आहे, त्यामुळे नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून रस्त्याचे काम तातडीने पूर्ण व्हावे यासाठी स्वाभिमानीचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय जेऊघाले यांनी सातत्याने आंदोलने केली, त्यांचे आंदोलनानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग कामाला सुरुवात करायचा, ठेकेदार थोडे कामही करायचा आणि पुन्हा गायब व्हायचा, त्यामुळे आज (ता.११ जाने २०२३) दत्तात्रय जेऊघाले यांनी आक्रमक पवित्रा आत्मदहनाचा इशारा देत खामगाव येथील सार्वजनिक बांधकाम विभागात धडक देत राडा घातला... पोलीसांनी दत्तात्रय जेऊघाले यांना आत्मदहन करण्यापासून रोखले असले तरी त्यांनी व स्वाभिमानीचे जिल्हा संपर्क प्रमुख श्याम अवथळे यांनी कार्यकारी



अभियंता श्री.थोटांगे यांना चांगले धारेवर धरले, त्यांचा आक्रमक पवित्रा बघता कार्यकारी अभियंता श्री.थोटांगे यांनी कोणत्याही परिस्थितीत ३१ जानेवारी पर्यंत रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले. जर दिलेले आश्वासन पूर्ण केले नाही तर १ फेब्रुवारी रोजी खामगावातील बांधकाम विभागाचे कार्यालय पेटून देवू, असा इशारा दत्तात्रय जेऊघाले यांनी दिला आहे.

## वने,सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा बुलडाणा जिल्हा दौरा...

जनसंचलन/बुलढाणा

राज्याचे वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार हे उद्या, शुक्रवार, (दि.१२) रोजी बुलडाणा जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचे छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी ९ वाजता सिंदखेड राजा येथे राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊसाहेब भोसले यांच्या जन्मस्थळी आगमन होईल. राजे लखुजीराव जाधव राजवाडा, सिंदखेड राजा - राज्य संरक्षित स्मारक व राष्ट्रमाता माँ जिजाऊसाहेब भोसले यांच्या ४२६ वी जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मंजूर असलेल्या राजवाडा जतन व संवर्धन या कामाचे त्यांच्या हस्ते भूमिपूजन होणार आहे. राष्ट्रमाता माँ जिजाऊसाहेब भोसले यांचे जन्मस्थळ येथून सकाळी ९.३० वाजता पंचायत समिती येथे आगमन व सिंदखेड राजा विकास आराखडा संदर्भात बैठकीस



उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रमातामाँ जिजाऊसाहेब भोसले यांच्या ४२६ वी जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम व राजमाता जिजाऊ यांच्यावर आधारीत टपाल तिकीटाचे सकाळी ११ वाजता अनावरण करण्यात येणार आहे. दुपारी १२.३० ते १ वाजेपर्यंत त्यांची वेळ राखीव असेल. त्यानंतर दुपारी १.१५ वाजता ते मोटारीने येथून हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाने संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार

डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

# नार्वेकरांच्या निकालानंतर ठाकरे गटात धुसफूस; सुभाष देसाई, अनिल देसाई या कारणामुळे टीकेच्या केंद्रस्थानी?...

वृत्तसंस्था/मुंबई

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बुधवारी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल दिला. यावेळी नार्वेकर यांनी शिंदे गट हाच खरा शिवसेना पक्ष असल्याचा निवाडा दिला. हा निकाल देताना राहुल नार्वेकर यांनी शिवसेना पक्षाची घटना, नेतृत्वरचना आणि विधिमंडळातील संख्याबळ या प्रमुख घटकांचा आधार घेतला. यावेळी नार्वेकर यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे असलेली शिवसेना पक्षाची १९९९ सालची घटना ग्राह्य धरली. २०१८ साली या घटनेत दुरुस्ती करण्यात आली होती. या दुरुस्तीनुसार उद्धव ठाकरे यांची शिवसेनेच्या पक्षप्रमुखपदी निवड करण्यात आली होती. तसेच त्यांना राष्ट्रीय कार्यकारिणीसह पक्ष पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांचे अधिकार देण्यात आले होते. त्यासंदर्भातील पत्र निवडणूक आयोगाला दिल्याचा दावा ठाकरे गटाकडून करण्यात आला होता. मात्र, निवडणूक आयोगाने ही बाब अमान्य करत तसे कोणतेही पत्र आम्हाला मिळाले नसल्याचे सांगितले. नेमकी हीच बाब शिंदे गटाचे पथ्यावर पडल्याने विधानसभा अध्यक्षांनी एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांना पात्र ठरवले होते. याच गोष्टीवरुन आता ठाकरे गटात अंतर्गत धुसफूस सुरु झाल्याची माहिती समोर आली आहे.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बुधवारी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल दिला. यावेळी नार्वेकर यांनी शिंदे गट हाच खरा शिवसेना पक्ष असल्याचा निवाडा दिला. हा निकाल देताना राहुल नार्वेकर यांनी शिवसेना पक्षाची घटना, नेतृत्वरचना आणि विधिमंडळातील संख्याबळ या प्रमुख घटकांचा आधार घेतला. यावेळी नार्वेकर यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे असलेली शिवसेना पक्षाची १९९९ सालची घटना ग्राह्य धरली. २०१८ साली या घटनेत दुरुस्ती करण्यात आली होती. या दुरुस्तीनुसार उद्धव ठाकरे यांची शिवसेनेच्या पक्षप्रमुखपदी निवड करण्यात आली होती. तसेच त्यांना राष्ट्रीय कार्यकारिणीसह पक्ष पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांचे अधिकार देण्यात आले होते. त्यासंदर्भातील पत्र निवडणूक आयोगाला दिल्याचा दावा ठाकरे गटाकडून करण्यात आला होता. मात्र, निवडणूक आयोगाने ही बाब अमान्य करत तसे कोणतेही पत्र आम्हाला मिळाले नसल्याचे सांगितले. नेमकी हीच बाब शिंदे गटाचे पथ्यावर पडल्याने विधानसभा अध्यक्षांनी एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांना पात्र ठरवले होते. याच गोष्टीवरुन आता ठाकरे गटात अंतर्गत धुसफूस सुरु झाल्याची माहिती समोर आली आहे. २०१८ साली पक्षाच्या घटनेतील बदलांची निवडणूक आयोगात नोंद का झाली नाही, असा सवाल पक्षातील एका गटाने उपस्थित केला आहे. या गटातील नेत्याने उद्धव ठाकरे यांच्याकडे आपले म्हणणे मांडले आहे. अनिल देसाई आणि सुभाष देसाई यांच्यावर पक्षाच्या संघटनात्मक कामाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. घटनेतील बदल, संघटनात्मक रचना, निवडणूक आयोगाशी पत्र व्यवहार यामध्ये



त्रुटी आढळल्याने विधिमंडळ अध्यक्षांनी विरोधात निकाल दिल्याची भावना पक्षातील एका गटाच्या मनात तयार झाली आहे.याबाबत उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करण्यासाठी संजय राऊत, अरविंद सावंत आणि सुभाष देसाई मातोश्रीवर दाखल झाले आहेत. सध्या मातोश्रीवर या अनुषंगाने खलबतं सुरु आहेत. जर निवडणूक आयोगात घटनेतील बदलांसह घटनेची प्रत सोपवण्यात आली असेल तर एंडोर्समेंट कॉपी घेऊन पत्रकार परिषद घ्यावी. पण पक्षाकडे एंडोर्समेंट कॉपी नसेल तर देसाईंना जाब विचारण्यात यावा, अशी मागणी या नेत्यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे. त्यामुळे आता मातोश्रीवरील बैठकीत काय निर्णय घेतला जाणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीनिमित्त. एक वर्षीय पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणाचे मोफत आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२७ व्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने आझाद हिंद महिला संघटना व देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने २३ जानेवारी २०२४ ते २३ जानेवारी २०२५ पर्यंत सदर प्रशिक्षण आहे. २३ जानेवारी २०२४ रोजी प्रारंभ होणाऱ्या प्रशिक्षण शिबिरामध्ये आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी नाममात्र नोंदणी शुल्क घेऊन आयोजन करण्यात आले आहे.

मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यातील, विदर्भातील विद्यार्थी विद्यार्थिनी सैनिक व पोलीस भरती परीक्षेत यशस्वी झाले पाहिजे. या उदात्त भावनेतून सदर भरतीपूर्व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकरी, कष्टकरी, शेतमजुरांच्या मुला मुलींना वर्तमान परिस्थितीत पोलीस व सैनिकी भरतीच्या स्पर्धात्मक परिक्षेत प्राविण्य मिळवण्यासाठी प्रशिक्षित प्रशिक्षकांना नियुक्त करण्यात आले आहे. करिता जिल्ह्यातील होतकरू, गरजवंत विद्यार्थी विद्यार्थिनींनी सदर भरतीपूर्व प्रशिक्षण शिबिराचा बहुसंख्येने लाभ घ्यावा. असे आवाहन आझाद हिंद महिला संघटना व देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२४ च्या वतीने प्रदेश महिला संपर्कप्रमुख सुरेखाताई निकाळजे यांनी केले आहे. संबंधितांनी आझाद हिंद महिला संघटनेचे संपर्क कार्यालय मुख्य बस स्टॅन्ड मागे, जांभरुण रोड, राऊत कॉम्प्लेक्स येथे प्रत्यक्ष येऊन नाव नोंदणी करणे क्रमप्राप्त आहे. प्रथम नाव नोंदणी झालेल्या शंभर विद्यार्थी विद्यार्थिनींना प्राधान्य आहे. अधिक माहितीसाठी ८४३२३६७७६७ या कार्यालयीन नंबर वर संपर्क साधावा.

मराठा महिला अर्बन
को-ऑपरेटिक क्रेडीट सोसायटी लि, बुलडाणा
पत्ता. ग्रीन वर्ल्ड नर्सरी जवळ, चिखली रोड, सुंदरखेड, बुलडाणा
पाहिजेत

| अ.क्र. | पदमान | शैक्षणिक अहर्ता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | शाखाधिकारी | पदधिकारी (G.D.C & A) शाखधिकारी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव. | ०१ |
| २ | लिपीक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०५ |
| ३ | कर्जअधिक्षक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०२ |
| ४ | शिपाई | १० वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०२ |
| ५ | पिगमी एजेन्ट | पदविधर / १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०६ |
| ६ | वाहन चालक | १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०१ |

इच्छुक उमेदवार यांनी आपल्या बायोडाटा / शैक्षनिक कागदपत्रे व पासपोर्ट फोटो सहखालील ई-मेल वर पाठवावा. marathamahilaurban157@gmail.com
तसेच मुलाखतीची वेळ आणि दिनांक संपर्क करुन कळविण्यात येईल
माहितीसाठी संपर्क
सोनु राऊत (हॉटेल मराठा चिखली रोड, बुलडाणा)
मो. ९६२३५ ५३३३३, ९१५८०००१५७ वर कॉल करु शकतात.